International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# काँग्रेस प्रभावाकडून —हासाकडे

**प्रा. निकम अधिकराव हिंदूराव**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री. विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ वडगाव, कोल्हापूर
*Corresponding Author - प्रा. निकम अधिकराव हिंदूराव*
DOI - 10.5281/zenodo.14684873

**प्रस्तावना —**

स्वातंत्र्योत्तर काळापासून ते १९७५ पर्यंतच्या कार्यकाळातील बराचसा अधिक कार्यकाळ महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाने राज्य केले. काँग्रेसचे सत्तेतील प्राबल्य यामुळे नेहमीच काँग्रेस पक्षामध्ये वाढ होत गेली. सतत सत्तेवर राहण्याचे फायदे काँग्रेस पक्षाला १९९५ सालापर्यंत मिळत राहीले. ज्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणावर या पक्षाचे वर्चस्व राहीले. तरीही १९७८ ते १९९५ हा कालखंड तसा महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभुत्व गाजवणा—या काँग्रेस पक्षाचा प्रभाव उतरणीस लागणाचा कालखंड आहे. १९७७ च्या निवडणुकीच्या वेळी संपूर्ण देशात काँग्रेस विरोधी लाट असतानाही महाराष्ट्रात मात्र या पक्षाने चांगले यश मिळविले होते. पण त्यानंतर महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष १९७८ च्या दरम्यान फूटला. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली प्रस्थापित गट आणि त्यांच्या विरोधात मराठेत्तर जाती समूदायाचे प्राबल्य असणारा इंदिरानिष्ठ गट अशी महाराष्ट्रात काँग्रेसची विभागणी झाली. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत चव्हाण निष्ठ आणि इंदिरा निष्ठ काँग्रेस जरी एकत्र येऊन सत्ता स्थापन केली असली तरी जनता पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्याचे दिसून येते. त्यातूनच काँग्रेस पक्षाचे सामर्थ्य व प्रभाव कमी होत जाऊन १९९५ साली या पक्षाला आपली सत्ता गमवावी लागल्याचे दिसून येते. काँग्रेस पक्षाच्या या ढासळत्या प्रभावाला ब—याच अंशी पक्ष श्रेष्ठीचे धोरण कारणीभूत असल्याचे दिसून येते.

यशवंतराव चव्हाण यांचे काँग्रेसमध्ये निर्विवाद वर्चस्व होते. त्यांच्या सुरूवातीच्या काळामध्ये पक्ष एकसंघ होता. १९७१ च्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये इंदिरा गांधीजींचे सामर्थ्यशाली नेतृत्व सर्वमान्य झाल्यानंतर त्यांनी राज्यस्तरावरील ताकतवान नेत्यांच्या सामर्थ्याचे खच्चीकरण करण्याचे धोरण स्वीकारले आणि त्यातूनच महाराष्ट्रामध्ये

जाणीवपूर्वक मराठा—मराठेत्तर वाद वाढविला गेला. त्यातूनच इतर मागास जाती दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याखाच्या युतीची संकल्पना साकार झाली. यादरम्यान मराठा व मराठेत्तर वाद उत्तरोत्तर वाढत गेला आणि १९७८ साली पक्ष दुभंगत असताना मराठेत्तर गटाने यशवंतराव चव्हाणाचे नेतृत्व नाकारले. या वादाची परिणाम म्हणजे काँग्रेस हा मराठयांचा पक्ष आहे आणि अन्य जातीवर अन्याय होत आहे. अशा समजूतीतून काही समाजघटक काँग्रेस पक्षापासून लांब गेले. १९७५ साली प्रदीर्घ अनुभव असलेले मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना राजीनामा दयावा लागला आणि त्यातूनच पक्षश्रेश्ठींनी महाराश्ट्रावर मुख्यमंत्री लादण्याचा चुकीचा प्रघात सुरू झाला.

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये पक्ष श्रेष्ठींचे अतिक्रमण काँग्रेसच्या मुख्यमंत्र्याच्या नेमणुकीबरोबरच मंत्रीमंडळाच्या रचनेपर्यंत येऊ लागल्याने षह—काटषाहाच्या राजकारणाला ऊत आला. १९७८ साली पक्ष श्रेश्ठींचे वर्चस्व असावे यासाठी पक्षश्रेष्ठींची मर्जी असलेल्या नाशिकराव तिरपूडे या मराठेत्तर जातीच्या नेत्याची उपमुख्यमंत्री पदी नियुक्ती करण्यात आली. अशाप्रकारे पक्ष श्रेष्ठीविरूध्दचा असंतोश उफाळून येऊन १९७८ साली षरद पवार यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी काँग्रेस पक्ष निर्माण झाला. पक्ष श्रेश्ठींचे चुकीचे धोरण आणि कुटनितीमुळेच महाराष्ट्रात काँग्रेसचा प्रभाव कमी होत गेल्याचे दिसून येते. काँग्रेस मधील गटबाजीला काही तात्विक मतभेद जसे जबाबदार होते तसेच पक्ष श्रेष्ठींचे धोरणही जबाबदार ठरले. ही गटबाजी तिव्र स्वरूप जिल्हा ते केंद्र पातळीपर्यंत अशाप्रकारची गटबाजी दिसून येऊ लागली. पक्षनेतृत्वात अविष्वास वाढू लागला आणि गट आणि काटशाहाचे राजकारण वाढू लागले.

''गटबाजीच्या राजकारणामुळे काँग्रेस पक्ष पोखरला गेला असला तरी १९९० पर्यंत प्रभावी विरोधी पक्ष अस्तित्वात नसल्याने हाच पक्ष पुन्हा सत्ता संपादन करित असे १९९० च्या विधानसभा निवडणुकित काँग्रेस पक्षास काटावरचे बहुतम प्राप्त झाले. हा धोक्याचा इशारा होता. परंतू गटबाजीच्या राजकारणात मग्न असलेल्या नेत्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आणि अखेर १९९५ साली सत्ता गमावली. विषेश म्हणजे शिवसेना—भाजपाला स्पष्ट बहुमत मिळवून देण्यासाठी अपक्षांचा फौजफाटा काँग्रेस पक्षाच्या विशिष्ठ गटानेच पुरवला'' म्हणजेच पक्ष श्रेश्ठींचे चुकीचे धोरण व काँग्रेस पक्षांतर्गत तीव्र स्वरूपाच्या गटबाजीमूळे काँग्रेस पक्षाचा —हास झाल्याचे दिसून येते.

१९९२ मध्ये हिंदुत्ववादी पक्षाने आयोध्येत बाबरी मस्जिदीच्या ठिकाणी राममंदिर व्हावे यासाठी आंदोलन उभारले महाराष्ट्रातही शिवसेना व भाजपकडून चालविल्या गेलेल्या धर्माच्या नावाखालील या आंदोलनाला खूप प्रतिसाद मिळाला. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हिंदूत्वाची एक प्रकारे लाट उसळली. केंद्रीय नेतृत्वाने काँग्रेसचे महाराश्ट्रातील मुख्यमंत्री सुधाकर नाईक यांना पदावरून काढून त्यांच्या ठिकाणी केंद्रात संरक्षण मंत्री म्हणून काम करणारे षरद पवार यांना मुख्यमंत्री केले. हे वातावरण तसे काँग्रेस विरोधी होते. निवडणूका समोर येताच भाजप व शिवसेना नेते अधिक आक्रमक बनले. हिंदूत्ववादी वातावरण व काँग्रेसच्या कचखाऊ राजकारणाचा शिवसेना व भाजपाला फायदा होऊन त्यांना १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळाले. काँग्रेस पक्ष तिस—या नंबरवर फेकला गेला. १९९६ पासून केंद्रात भाजपाच्या मदतीने संयुक्त आघाडी सरकार सत्तेवर आले. इंदिरा काँग्रेसला मोठा धक्का बसला असे बहुतेक केंद्रीय काँग्रेसच्या नेत्यांना वाटत होते. पण जेव्हा सोनिया गांधीचे काँग्रेसच्या अध्यक्ष पदासाठी नाव पुढे आले तेव्हा त्या विदेशी आहेत असा विचार पुढे आला ज्याचे नेतृत्व षरद पवार यांनी केले. काँग्रेस अध्यक्ष निवडीत विरोधी भूमिका घेतल्याने त्यांना पक्षातून काढण्यात आले.

१९९९ व्या लोकसभा व मुदतपूर्ण विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर षरद पवरांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्ये फुट पडून राश्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना करण्यात आली. परिणामी काँगेस पक्ष कमुकवत झाला. षरद पवारांच्या निलंबन नंतर महाराष्ट्राच्या काँग्रेसमध्ये फूट पडली. महाराष्ट्र कायदेमंडळातील काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी शरदरावाचे समर्थन केले म्हणून ऐकून तीन आमदारांना काँग्रेस मधून काढून टाकण्यात आले. थोडक्यात सागायचे झाल्यास महाराष्ट्राच्या काँग्रेस पक्षातील अंतर्गत गटबाजी केंद्र व राज्याच्या काँग्रेसच्या धोरणातील मतभेद व शिवसेना भाजपची ही हिंदूत्ववादी नारा अशा अनेक कारणांमळे महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेसचा प्रभाव कमी होत गेलेला दिसून येतो.

**काँग्रेसपासून काही घटक पक्ष बाजूला—**

महाराष्ट्रात काँग्रेसची अनेक दशके सत्ता राहिली काही अपवाद वगळल्यास काँग्रेस पक्षच १९४७ पासून महाराष्ट्रात सत्ताधारी होता. अगदी सहकारी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था ते राज्यस्तरापर्यंत काँग्रेसचे प्रभुत्व होते. सहकारी साखर कारखाने, सहकारी संस्था व संपूर्ण आर्थिक व्यवस्था

काँग्रेसच्या ताब्यात होती. केंद्रात व राज्यात काँग्रेसची सत्ता प्रबळ होण्याचे हे महत्त्वाचे कारण होते. विरोधी पक्षाच्या काळात महाराष्ट्रात जनता पक्षाला सर्वात जास्त जागा मिळाल्या होत्या. पण वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येऊन त्यांचे सरकार सत्तेवर आले. १९९० च्या निवडणुकांपर्यंत विरोधी पक्षांना ग्रामीण भागातील काँग्रेस वर्चस्वाला धक्का लावता आला नाही. १९९० च्या निवडणुकीत शिवसेना भाजप युतीला काँग्रेसच्या खालोखाल जागा मिळाल्या होत्या म्हणजेच काँग्रेस पक्षाचे प्रभुत्त्व हळूहळू कमी होण्यास सुरूवात झाली होती. १९९५ साली सत्तांतर घडून आले आणि केवळ काँग्रेस पक्षाची सत्ता संपुष्टात आली असे नव्हे तर एक पक्ष प्रभुत्व पध्दतीचा अस्त झाला आणि त्याची जागा स्पर्धात्मक द्विपक्ष पध्दतीने घेतली. त्यानंतरच्या काळामध्ये काँग्रेसच्या विरोधात शिवसेना — भाजप युती तुल्यबळ प्रतिस्पर्धी म्हणून उभी राहिली. व अपक्षांचा एक गटही तिसरी राजकीय षक्ती म्हणून उदयास आली.

काँग्रेसच्या विरोधात परंपरागत प्रतिस्पर्धी म्हणून जे पक्ष उदयास आले त्यांनी काँग्रेसचे जितके खच्चीकरण केले तितकेच खच्चीकरण हे काँग्रेस अंतर्गत घटकांपासूनही झाल्याचे दिसून येते. भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये काँग्रेसचे वर्चस्व हे सर्वमान्य होते. महाराष्ट्रामध्ये हा काँग्रेस पक्ष प्रभावी राजकीय पक्ष आहे. काँग्रेस हा एकमुखी नेतृत्वाला मानणारा पक्ष असल्याने त्यांच्यातील वैचारिक मतभेद हेच महत्त्वाचे कारण काँग्रेस पासून काही लोकांनी दूर जाण्याचे मानले जाते. १९४८ मध्ये जयप्रकाश नारायण व अशोक मेहता यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून समाजवादी पक्षाची स्थापना करण्याच्या पाठीमागे हेच महत्त्वाचे कारण मानले जाते. याच काँग्रेस मधून केशवराव जेधे आणि त्यांचे सहकारी बाहेर पडले व त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. १९६९ मध्ये काँग्रेसचे विभाजन होऊन इंदिरा काँग्रेस व संघटना काँग्रेस असे दोन पक्ष निर्माण झाल्याचे दिसून येते. १९७७ नंतरच्या काँग्रेस पक्षातही रेड्डी गट व इंदिरा गांधी गट असेही विभाजन झाल्याचे दिसून येते. १९७८ साली महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष दुभंगला आणि महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांना मानणारा आणि इंदिरा निष्ठाचा काँग्रेस पक्ष असे दोन पक्ष स्थापन झाले. याचाच पुढचा टप्पा म्हणजे १९७८ साली षरद पवार यांनी समाजवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. १९७८ ते १९८६ या कालखंडात महाराष्ट्रात इंदिरावादी आणि समाजवादी काँग्रेस पक्षात सत्ता मिळवण्याची स्पर्धा सुरू होती. १९८६ साली शरद पवारांनी समाजवादी काँग्रेस

पक्ष मुख्य प्रवाहात विलीन झाला थोडक्यात सांगायचे झाल्यास स्वातंत्र्योत्तर काळामध्ये काँग्रेसमधून महाराष्ट्रात समाजवाद पक्ष, शेतकरी कामगार, पक्ष संघटना काँग्रेस, यशवंतराव चव्हाण याचा काँग्रेस तसेच षरद पवाराचा समाजवादी काँग्रेस व नंतरचे राष्ट्रवादी काँग्रेस इत्यादी काँग्रेसमधून वेगळे झालेले राजकीय पक्ष आहेत. कालांतराने असे बाहेर गेलेले अनेक गट नेते स्वगृही आले आहेत.

**सारांश —**

महाराष्ट्रामधून काँग्रेस पक्षाची सत्ता व षक्ती कमी होण्याची काही कारणे दिसून येतात. महाराष्ट्रातील काँग्रेस मध्ये मराठयाचे वर्चस्व होते. बहुजन समाजाने मराठा जातीचे नेतृत्व स्वीकारले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाणानी मराठेत्तर जाती समूहाच्या राजकीय आकांक्षाची योग्य ती दखल घेतली होती. परंतु नंतरच्या काळात पक्षश्रेश्ठींचा वाढता हस्तक्षेप महाराश्ट्रातील काँग्रेसच्या राजकारणाला वेगळे वळण देणारा ठरला. १९७९ नंतर महाराश्ट्रात मराठा—मराठेत्तर वाद वाढत गेला त्याचाच परिणाम म्हणून मराठयाचे नेतृत्व संपूष्ठात आणण्यासाठी मराठेत्तर जातीचे नेते प्रवृत्त झााले आणि त्याच्या प्रयत्नाना पक्ष श्रेष्ठींनी खतपाणी घातले. या वादामुळेच नंतर काँग्रेस पक्षाअंतर्गत गटबाजी वाढत गेली. नंतर याच वादामुळे विदर्भातील काही इतर मागास जाती काँग्रेसपासून दुरावल्या. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रदीर्घ वादामुळे दलितातील काही गट काँग्रेसपासून दुरावले. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर केल्याने मराठवाडयातील मराठा समाज काँग्रेसपासून दूरावला. १९९२—९३ च्या दंगली नंतर मुस्लीम समाज दुरावला गेला आणि त्यांच्या पाठिंब्यात घट झाली. थोडक्यात सांगायचे झाल्यास नंतरच्या काळामध्ये काँग्रेस पक्षापासून काही घटक बाजूला गेल्याचे दिसून येते.

शिवसेना आणि भाजपा या पक्षाने महाराष्ट्रामध्ये प्रबळ पक्ष संघटनेचे जाळे उभारण्यास सुरूवात केली होती. काँग्रेस अंतर्गत आलेल्या दुर्बलतेचा फायदा घेणे त्याना सहज षक्य झाले. काँग्रेस पक्ष प्रदीर्घ काळ सत्तेत राहिल्याने काँग्रेसचे नेते ब—याच अंशी सत्तेच्या धुंदीत होते. त्यांना काँग्रेस पक्ष कमकुवत होत चालला आहे याचीही जाणीव नव्हती अंतर्गत कुरघोडी त्याचबरोबर पक्षाचे हीत बघण्याऐवजी स्वहीताकडेच त्यांचे अधिक लक्ष होते. पक्षाला सामर्थ्य देण्याची क्षमता व पक्ष एकसंघ करण्याचा प्रयत्न करणा—या प्रभावी नेत्याला विरोध करण्यामध्येच हे लोक धन्यता मानत. त्यांच्या हया

आत्मकेंद्री राजकारणाचा ही कॉँग्रेसची वाताहत होण्यामध्ये महत्त्वाचा वाटा आहे. एकूणच महाराष्ट्रामध्ये व देशामध्ये ज्या कॉँग्रेस पक्षाची एकमुखी सत्ता होती त्या कॉग्रेस पासून काही घटक पक्ष बाजूला गेल्यामूळे कॉँग्रेसची षक्ती नंतरच्या काळामध्ये हळूहळू कमी होत गेल्याचे दिसून येते.

**संदर्भ —**


१) भारतातील राज्यांचे राजकारण — प्रा.डॉ.मोहन दिवाण, विद्या प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती — २००४ पृ. १४६—१४७

२) महाराष्ट्र षासन — प्रा. बी. बी पाटील फडके प्रकाशन प्र. आ. २०११ पृ ४७

३) महाराष्ट्राचे षासन आणि राजकारण डॉ. षोभा कारेकर, डॉ. षरद घोडके, अंतुल पब्लिकेशन्स नागपूर प्र. आ. २००४ पृ. १५८

४) महाराष्ट्र षासन आणि राजकारण — डॉ. अशोक जैन — षेटे पब्लिषर्स मुंबई — सन १९९८ प्र. आवृत्ती — पृश्ठ १०७

५) महाराष्ट्राचे षासन आणि राजकार — डॉ षोभा कारेकर, डॉ. षरद घोडके — अंतुक पब्लीकेशन नागपूर — प्र. आ. २००४ पृ. १६९

६) तत्रैव पृ. १७१

७) आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण — व म. सिरसीकर, कॉन्टिन्हल प्रकाशन विजय नगर पुणे ३० प्र. आ.२००१, वि, आ. २००८ — पृ. २४७

८) भारताचे षासन आणि राजकरण — डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे — चौथी आवृत्ती — २०१० — पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स नागपूर पृ. २०९

९) महाराश्ट्राचे षासन आणि राजकारण — डॉ एकनाथ खांदवे — आरती प्रकाशन कर्जत, प्रथम आ. २००९ पृ. १९